विद्याविकास

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## विद्यार्थी विकास मंडळ
## राष्ट्रीय छात्र सेना

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

लेफ्ट. आशिष सांगळे

संपर्क : +९१७०२८९९११८१
: ०२०–२५६२२६८३

**संदर्भ क्र. विविमं/२०२५-२६/४५९** **मुदतवाढ** **दि. २९/१२/२०२५**

**प्रति,**
**मा. प्राचार्य/संचालक,**
**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित**
**सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था,**
**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.**

**विषय : महाविद्यालयातील राष्ट्रीय छात्र सेना युनिटची माहिती भरण्याच्या मुदतवाढीबाबत.**

**महोदय/महोदया,**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र व विस्तार विभाग आणि विद्यार्थी विकास मंडळास दिनांक २९ सप्टेंबर, २०२२ पासून राष्ट्रीय छात्र सेना सब युनिटसाठी मान्यता मिळाली असून सदर युनिट 3 MAH Armd Sqn, Pune युनिटशी संलग्न आहे. विद्यार्थ्यांवर एकता व स्वयंशिस्त तसेच श्रम संस्कार, कौशल्य संस्कार, सर्वांगीण चारित्र्य विकास देखिल व्हावेत या हेतूने विद्यार्थ्यांना सहाय्यभूत ठरणाऱ्या या उपक्रमात विद्यार्थ्यांचा भरपूर उस्फूर्त प्रतिसाद व सहभाग लाभत असतो.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या राष्ट्रीय छात्र सेना सुकाणू समितीच्या बैठकीत पुणे शहर, पुणे ग्रामीण, अहिल्यानगर व नाशिक जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयातील राष्ट्रीय छात्र सेना तुकडीबाबतची माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर संकलित करण्याबाबत सूचित करण्यात आले. येणाऱ्या कालावधीमध्ये विद्यापीठाकडून राष्ट्रीय छात्र सेना कॅडेट करीता विद्यापीठ पातळीवर विविध शिबिरांचे/कार्यशाळा/व्याख्यान/उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे.

आपल्या महाविद्यालय मान्यताप्राप्त परिसंस्थामध्ये असणाऱ्या राष्ट्रीय छात्र सेना तुकडीची माहिती (www.Unipune.ac.in - BOD - BOD online - Login - User Name & Password - Online Services - NCC - NCC Unit Information) येथे ऑनलाईन (Online) पद्धतीने दि. ५ जानेवारी, २०२६ दु. ०३.०० वाजेपर्यंत भरण्याबाबत आपल्या महाविद्यालयातील/मान्यताप्राप्त परिसंस्थेतील राष्ट्रीय छात्र सेनेचे सहयोगी एनसीसी अधिकारी (ए.एन.ओ.), (सी.टी. ओ) यांना सूचित करावे.

कळावे, ही विनंती.

**तांत्रिक अडचणीसाठी :**
**रा.छा.से. कार्यालय संपर्क क्र. : ०२०२५६२२६८३**
**मेल आयडी : nccsupport@unipune.ac.in**

**(ले. आशिष सांगळे),**
सहयोगी एनसीसी अधिकारी,
राष्ट्रीय छात्र सेना

**(डॉ. सविता कुलकर्णी),**
संचालक, (अतिरिक्त कार्यभार)
विद्यार्थी विकास मंडळ